# संदर्भ ग्रंथ सूची


| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | | लेखक |
|---|---|---|---|
| १) | संत वाङ्‌मयाची सामाजिक फलश्रुती पृष्ठ क्र. ७ | – | गं. बा. सरदार |
| 2) | पाच भक्तिसंप्रदाय पृष्ठ क्र. १२७ | – | र. रा. गोसावी |
| 3) | साक्षात्कारी संत तुकाराम | – | शं. ना. पेंडसे |
| ४) | तुकाराम महाराज चरित्र पृष्ठ क्र. १५ | – | प्रा. र. रा. गोसावी |
| ५) | विचार भारती फेब्रु – मार्च २००१ अंक ६ वा लेखाचे नाव "एवढ आता कळल पाहीजे" पृष्ठ क्र. २६ | – | डॉ. सुमन पाटील |

# प्रकरण दुसरे

## तुकारामाच्या चरित्राची रूपरेषा

गृहस्थ तुकाराम , संत तुकाराम, कवि तुकाराम, विद्रोही तुकाराम या चारही भूमीकांचा मिलाफ असणाऱ्या महापुरूषाच्या चरित्राचे थोडक्यात मांडलेले विवेचन.

तुकोबांच वडील पुत्राचे ( महादेवबोवांचे ) वंशज रामभाऊ देहूकर यांचेकडे वंशावळ आहे ती अशी

विश्वंभरबोवांचे वंशज

( कुटुंब आमाबाई )

हरिबोवा — मुंकुदबोवा

हरिबोवा

↓ ( कु. विठाबाई )

विठोबा

↓

पादाजीबोवा

↓

शंकरबोवा

↓

कान्हया

↓

बोल्होबा

↓

श्री तुकाराम

तुकारामाचे जनक बोल्होबा व माता कनकाई बोल्होबांनी देहुस संसार, सुखाचा केला हा गृहस्थ विठ्ठलभक्त असून त्याने दोन तपे स्वस्त्रीसमवेत पंढरीची वारी केली. बोल्होबास कित्येक दिवस संतान नव्हते नंतर त्यास तीन मुलगे व एक मुलगी झाली.

मुलाची नावे :– १. सावजी
२. तुकाराम
३. कान्होबा

ही वंशावळ श्री तुकाराम अर्थात व्यवहारधर्म [3]

या दत्तात्रय विष्णु पारखे यांच्या पुस्तकातून घेतली आहे. त्यांनी ही वंशावळ महीपत बाबांनी सांगितलेली वंशावळ तुकोबांच्या देहुकडील वंशजाकडे असलेली वंशावळ 3

## शुद्धबीजापोटी फळे रसाळ गोमटी

तुकारामाचा जन्म इ. स. १६०८ मध्ये पुण्याजवळील देहु या गावात झाला. त्यांचे पूर्ण नाव तुकाराम बोल्हाबा आंबिले असे आहे. त्यांचे घराणे प्रतिष्ठीत गणले जात होते. देहु महाजनकीचा हक्क आणि उत्पन्न परंपरेने त्यांच्याकडे चालू होते. शेती, सावकारी आणि व्यापार हा व्यवसायही पारंपरिक होता. तुकारामांची आर्थिक परिस्थिती खरोखरच समाधानकारक होती. तुकारामांचे आठवे पूर्वज विश्वंभर बाबा पांडूरंगाचे एकनिष्ठ भक्त होते. त्यांनी आपल्या गावाजवळच विठ्ठल– रखुमाईची मुर्ती स्थापन केली होती. त्यामुळे विठ्ठलाची उपासना वर्षानुवर्षे तुकारामांच्या घराण्यात होत राहील व तिचा वारसा तुकारामांपर्यंत चालत यावा यात आश्चर्य नाही. विठ्ठलांच्या भक्तीची दृढ संस्कार या घराण्यातच रूजलेले होते. तुकारामांच्या अभंगातुन या भक्तीचे जे उत्कट रूप दिसते, त्याचे मुळ त्यांच्या कुळातील या व्रतात सामावलेले आहे. " शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी " असे तुकारामानीच अन्यत्र काढलेले उद्‌गार त्यांच्या स्वतःच्या चरित्राला यथार्थतेने लागु पडतात. तुकारामाचे वडील बोल्होबा व आई कनकाई यांनी विठ्ठलाच्या उपासनेचे व्रत घरात अखंड चालू ठेवले होते. ते संस्कार तुकाराम आणि त्यांचे बंधु सावजी व कान्होबा यांच्या मनात पूर्णपणे उतरले. हे घराणे श्रद्धाळू, ईश्वरनिष्ठा सत्प्रवृत्त व संस्कारसंपन्न होते. यामुळेच त्यांच्या अभंगवाणीत या साऱ्या विशेषांचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले दिसते. बालपणापासुनच तुकारामांच्या कानामनावर विठ्ठलाचे नांव पुनःपून्हा येत होते आणि ते त्यांच्या चित्तात रूजत होते. त्यांच्या व्यक्तित्वाने पुढे जी वळणे घेतली आणि विकसाच्या अथांगात

जी झेप घेतली, त्याचे मुळ बालपणी झालेल्या या धार्मिक संस्कारातच आहे. भगवंताच्या भक्तीचा हा वारसा लहानपणी त्यांना मिळाली नसता तर भक्ती साहित्याला प्रतिष्ठा मिळवून देणारी गुणसंपन्न कविता तुकारामांच्या लेखणीतुन पाझरली असती काय, याची शंका वाटते. विठ्ठल हे आपल्या जीवनाचे कसे निधान आहे व या कुलदैवताशिवाय आपल्याला दुसरा त्राता कसा नाही, याचे तुकोबानी वर्णन केले आहे. ते म्हणतात,

विठ्ठल आमचे जीवन । आगमनिगमाचे स्थान ।
विठ्ठल सिद्धीचे साधन। विठ्ठल ध्यान विसावा ।। 1।।
विठ्ठल कुळीचे दैवत । विठ्ठल वित्त गोत चित्त ।
विठ्ठल पुण्य पुरूषार्थ । आवडे मात विठ्ठलाची ।। 2।।
विठ्ठल विस्तारला जनी । सप्त द्वी पाताळे भरूनी ।
विठ्ठल व्यापक त्रिभुवती । विठ्ठल मुनिमानसी ।। 3।।
विठ्ठल जीवाचा जिव्हाळा । विठ्ठल कृपेचा कोंवळा ।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा। लावियेले चाळा विश्व विठ्ठले ।। 4।।
विठ्ठल विणचाड नाही गोता । तुका म्हणे आता नाही दुसरे ।।

विठ्ठल हा आपल्या जीवाचा जिव्हाळा आहे असे ते म्हणतात. तेव्हा या दैवता विषयीच्या त्यांच्या गाढ आत्मीय भावाची कल्पना येते. या आत्यंतिक, असीम निष्ठतूनच त्यांना बळ लाभले. संत पुरूषांच्या चरित्राचा विचार करताना त्यांची निष्ठास्थाने किती बळकट असतात, याची कल्पना येते. अंधश्रद्धा आणि संशय यांनी पोखरलेल्या मनात कर्तृत्वाचे अंकूर उगवत नाहीत. कुठेतरी उदंड श्रद्धा असली तर कार्याला चालना मिळते. अशक्य कोटीतील कार्य ही माणसे त्या आवेशात सहज करू शकतात. विठ्ठलाला आपले सर्वस्व मानणाऱ्या तुकोबानी त्यांच्या प्राप्तीसाठी रात्रंदीन आपल्या अभंगातून अक्षरशः टाहो फोडला आहे, भक्ती ही वंशपरंपरेने त्यांच्या धमन्यातून वाहत आली या भक्तीच्या शक्तीनेच आम्ही कलीकाळालाही भिणार

नाही, असा जबरदस्त विश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला. पंढरीची वारी हे आपल्या घराण्याचे पूर्वपूण्य आहे असे उद्गार ते काढतात.

पंढरीची वारी आहे माझे घरी
आणिक न करी तीर्थव्रत
व्रत एकादशी करीत उपवासी
गाईने अहर्निशी मुखी नाम
नाम विठोबाचे घेईन वाचे
बीज कल्पांतीचे तुका म्हणे

एका सत्व संपन्न घरातल्या शुद्ध वातावरणात तुकोबा वाढले. आचार आणि विचार स्वच्छता हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक महनीय विशेष आहे. तुकारामांचे आणि त्यांचे बंधु यांचे विवाह तत्कालीन पद्धतीला अनुसरून बालवयातच झाले. तुकारामाची पहिली बायको रखुमाबाई हिला दम्याच्या विकाराने ग्रासल्याने खेड गावच्या गुळवे यांच्या मुलीशी तुकोबांचे दुसरे लग्न करून देण्यात आले. संसार सुरळीत चालला होता. व्यापार उदि्दम उत्तम होता. पण त्यांची सर्वांगीण तुकोबांच्या अंगावर येऊन पडली. वडील वार्धक्याने थकत चालले होते. आपल्या मुलाने आता घरदार शेती, व्यापार सांभाळावा सारे व्यवहार त्यांनी स्वतःच्या बळावर पार पाडावेत. आणि आपल्याला प्रापंचिक मापातून मुक्त करावे, असे त्यांना वाटु लागले. आपल्या मुलांची कर्तबगारी पाहण्यात, उरलेले आयुष्य आता व्यतीत करावे असे वृद्धपित्याला स्वाभाविकपणे वाटू लागले. जेष्ठ पुत्र सावजी याच्यावर जबाबदारीचे ओझे टाकावे असे त्यांना वाटत होते. पण सावजीचे मत फारसे उत्सुक नव्हते. प्रपंच्यापेक्षा त्यांचा ओढा परमार्थाकडे अधिक होता. व्यापार उदयोगात गुंतुन राहण्यापेक्षा तीर्थयात्रा कराव्यात भजन पुजनात रमावे इकडेच त्यांच्या मनाचा अधिक कल होता आपल्या वडीलभावाची ही उदासिन वृत्ती पाहिल्यावर तुकोबानी संसाराची सारी सुत्रे मोठया निर्धाराने आपल्या हातात घेतली. आता ते एक यशस्वी वाणी म्हणून गणले जाऊ लागले. लहानवयात शिरावर पडलेली जबाबदारी परीश्रमपूर्वक पेलली पाहिजे या

विचाराने ते प्रपंचात कष्ट करीत होते यावेळी त्यांचे वय तेरा वर्षाचे होते. खरे तर या वयात व्यापार उद्दीम सांभाळून घराण्याच्या प्रतिष्ठेला सुसंगत अशा रितीने व्यवहार करीत राहणे कठीण असूनही तुकोबांनी या कामात यश मिळविले न्यायाने आणि उत्तम व्यवहाराने धन मिळवावे आणि उदात्त वृत्तीने ते खर्च करावे हा बहुमोलाचा धडा आपल्या कुमार वयातच त्यांनी मनःपूर्वक गिरविला. त्यांनी दाखविलेल्या या चातुर्यामुळे त्यांनी न त्यांच्या घराण्याची प्रतिष्ठा उंचावली हे असेच घडत राहीले असते तर तुकारामांच्या रूपाने एका अत्यंत व्यवहारदक्ष प्रापंचिक सद्गृहस्थाची प्रतिमा पहायला मिळाली असती; पण कुणी काही म्हटले तरी नियती नावाची एकही विलक्षण शक्ती माणसाच्या आयुष्यात अनेक अकल्पित बरेवाईट प्रसंग घडवून आनते. संथ दिसणाऱ्या पाण्यात एकाएकी प्रचंड खळबळ उत्पन्न होते आणि ते पाणी वाट फुटल तिकडे वाहु लागते. साधु संताच्या पुर्वाआयुष्याहून त्यांचे उत्तर आयुष्य अनेकवेळा अत्यंत भिन्न वाटेने गेल्याचे दृश्य दिसते कीतीतरी उदा. या संदर्भात देता येतील साऱ्या आयुष्यालाच अनपेक्षित कलाटणी देण्यात नियतीही कशी लहरी शक्ती आहे. हे स्पष्ट होते. तुकारामांची जीवन एका सरळ रेषेतुन बिनबोभाट चालले होते. व्यवसायीक प्रतिष्ठा व मान मान्यता आता त्यांना मिळाली होती. उणिव फक्त एका गोष्टींची होती ती सामाजिक क्षेत्रात त्यांचे व त्यांचे घराण्याचे स्थान खालच्या स्तरावर होते. वाणी म्हणुन त्यांचा उल्लेख होत असला तरी तो व्यवसायाच्या अर्थाने आपल्या सामाजिक स्थराचा जातीचा उल्लेख तुकाराम असा करतात.

यती शुद्र वैश्य वेवसाव । आदी तो हा देव कुळकुज्य

दुसऱ्या एका अभंगात ते म्हणतात

बरा कुणबी केलो नाही तरी दंभेची असतो मेलो.

वेदाची अक्षरे वाचण्याचा आपल्याला अधिकार नाही. अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे. ही वेदना त्यांच्या काव्यात अनेक ठिकाणी प्रकट झालेली दिसते. सावकारी आणि व्यापार उदीम करीत असल्यामुळे वाणी हे बिरूद चिकटलेल असले तरी

तूकोबा शुद्र होते असे त्यांनी म्हटले आहे.

**शुद्र वंशी जन्मलो। म्हणोनि दंभे मोकलिलो ।**

**अरे तुची आता माझा माय बाप पंढरी नाथा**

**घोकाया नाही अक्षरे मज अधिकार । सर्व भावे दीन तुका म्हणे यतिहीन.**

शुद्र वंशातल्या जन्मामुळे त्यांना विदयाभ्यास फारसा करता आला नाही. वेद शास्त्राचे आपण अध्ययन करावे अशी ओढ पुढे त्यांच्या अंतकरणात मिर्माण झाली. पण आपण अनाधिकारी आहोत. या कमालीच्या दुःख जाणिवेने त्यांना ते वाचन करता आले नाही. पुढे आपल्या ठायी असलेल्या महनिय प्रतिमेने आणि चिंतन शक्तीने मराठी शाखेचे ते कंठमणी ठरले. तरी त्यांचे जन्मजात शुद्रत्व कधिच पुसले गेले नाही. जाती अवस्थेचा चिवटपणा कीती केवढा विलक्षण असतो असा! संतालाही जात असते. संताची जात माणसाला विसरता येत नाही विष्णुशास्त्री चिपळणनकरांनी तुकारामांचा उल्लेख निबंधमालेत शुद्रकवी असा अनेक ठिकाणी कारण नसताना केला आहे याचा खेद वाटतो. मनुष्याचे कर्तुत्व जात, धर्म, भाषा आणि प्रांत यांच्या आटकेपलीकडे गेले तरी सामान्य माणसे त्याला त्याच्या जातीशीच कसे अट्टाहासानं कसे जखडून टाकतात, याचे हे एक उदाहरण आहे. मराठी भाषेचा हा शिवाजी अन्य कवींच्या जातीबद्दल बोलत नाही कारण ते तथाकथित उच्चवर्णिय आहेत. पण तूकारामांच्या शुद्रत्वावर बोट ठेवायला विसरत नाहीत ज्याच्या जीवनात परमेश्वरी साक्षात्कार घडला, आणि ज्याने आपल्या उदारमतवादी साहित्यातून श्रेष्ठ जीवनमुल्याची शिकवण सातत्याने दिली त्याचा जातीची विस्मृती होऊ नये याचा अर्थ एका लाजीरवाण्या परंपरेचा दास बनून आपण स्वतंत्र बुद्धीला कशी तिलांजली देतो आहोत. हेच सिद्ध होते. ज्ञानदेवांनी ज्या भागवंत संप्रदाय मंदीराचा पाया रचला त्याचा कळस हा शुद्र कवी झाला यावरून प्रतिभेला आणि कर्तृत्वाला जात व संप्रदाय असु शकत नाही. कारण या शक्ती जातीच्या अंकुचित भितीत कोंडून राहण्याइतक्या शुद्र असत नाहीत हे समजणे आवश्यक आहे. तुकारामाच्या जातीची आणि वंशाची वस्तुतः चर्चा करण्याची जरूर

नाही. तत्कालीन घटना व सामाजिक परीस्थिती यांच्या पार्श्वभुमीवर तुकोबांच्या चरित्राची चिकित्सा करावयाची असल्यामुळे या घटना वर्णाव्या लागल्या. तुकोबांच्या काव्यातील या घटनांमुळे जे वेगवेगळे तरंग उमटले आहेत. याची ही मिमांसा करणे सुकर व्हावे म्हणून हा उल्लेख केला आहे. आपल्या कनिष्ठ वर्णाची जळती जाणिव आणि रितीभातीचे अवलोकन करीत राहीलेल्या तुकारामांना जाणीव सारखी होत होती. पुढे त्यांनी रात्रंदीन आपल्याला अंतरबाह्य जगाबरोबर युद्ध करावे लागते असे जे म्हटले आहे. त्याचा संबंध काही अंशी या सामाजिक कनिष्ठ स्थराशी असु शकेल.

तुकारामांचे चरित्रकार महिपती यांनी भक्तीलीलामृतात तूकारामांच्य जाती संबंधी असे म्हटले आहे.

**शुद्रयाती माझी निश्चित । जन्मला तुकाराम वैष्णव भक्त।**

**जो जगत गुरूमुर्ती मंत । विश्वोद्धारार्थ अवतरला ।।**

याचा अर्थ तुकाराम हे जातीने शुद्र पण व्यवसायाने ते वाणी होते असा दिसतो. कसेही असले तरी संत पुरूषांना सुद्धा जाती आणि संप्रदाय यांच्या अकुंचित वर्तुळात बंदीस्त करून ठेवणे हे समाजाच्या शुद्रवृत्तीचे द्योतक आहे. तूकारामांची काही दु:खे जन्मसिद्ध उच्चनिचता गृहीत धरलेल्या समाज व्यवस्थेतुन उदयाला आली होती याबद्दल वाद नाही. थोर प्रतिभावंताना शुद्र जातीय कल्पनांशी लढण्यातच आपली शक्ती खर्च करावी लागणे हा एका अर्थाने त्या शक्तीचा अपमान आहे. पण जी कोणती व्यवस्था प्रचलीत असेल तिच्यातील वैगुण्ये दुर करण्यासाठी बंडखोरी करावी लागते. शुद्रत्व असुनही किर्तीउद्देशाने लेखन वाचन करून वर्ण अवस्थेसंबंधीच्या मुलभुत नियमासंबंधीचा तुकारामांनी भंग केला. आपल्या कवितेतुन अनेक ठीकणी अंध वर्ण विचारांवर प्रहार केले. जातीच्या बंधनाने काचावलेल्या त्यांच्या मनाची विरोधी प्रतिक्रीया त्यांच्या काव्यातून उमटावी हे संयुक्तीकच आहे.

तूकारामांचा संसार बाहयतः तरी समाधानकारक चालला होता. पण पूर्वी उल्लेखलेल्या प्रमाणे नियंतीची एक विध्वंसक लाट आली आणि त्यांच्या आयुष्यांची

घडी पूर्णपणे बिघडून गेली. स्वास्थ संपले सुख स्थैर्य पाहता पाहता विरून गेले. माथ्यावरचे आभाळच जणू संर्वागावर कोसळले. माता पित्यांचा मृत्यू झाला यावेळी तूकोबांचे वय तेरा वर्षाचे होत. वडील भाऊ सावजी यांची पत्नी पण मरण पावली सावजीचे लक्ष संसारात नव्हतेच तिर्थयात्रा करणेसाठी ते दुर निघुन गेले पुन्हा परतले नाहीत हळव्या मनाच्या तुकोबांना हे घाव सहन करणे फारच जड गेले पण जगरहाटीकडे लक्ष देऊन अशी संकट गृहीत धरण्याइतके ते समंजस होते त्यानंतर थोडयाच आवधीत १६२८ ते १६२९ मध्ये महाराष्ट्रात भयानक दुष्काळ पडला व्यापार बुडाला कर्ज झाले आर्थिक स्थिती खचली अन्नाची भ्रंतंत पडू लागली लाचारहचे शब्द उच्चारून वितीएवढेच पोट भरण्यासाठी महक मागण्याची आपत्ती आली ही आपत्ती त्यांनी स्वतःलाच किती अपमानास्पद वाटत होती याचा उल्लेख त्यांनी आपल्या आत्मचरित्रपर अभंगातून केला आहे.

काय खावे आता कोणाकडे जावे । गावात रहावे कोण्याबळे

ही अवस्था झाली. दुष्काळात गुरे ढोरे मेली त्यांची पहीली पत्नी अन्न अन्न करून तडफडून मरण पावली तिच्या मागे त्यांचा मुलगाही गेला. यातच भयंकर कौटुंबिक आपत्तीने तूकोबांचे सारे जीवन तर उध्वस्त झालेच पण त्यांच्या मनाला शततः तडे गेले घरात मृत्युने थैमान घातलेले त्यांनी पाहिले. बाहेरही तो तांडव करीत होता. सहस्त्रावधी लोक अन्नाच्या अभावी रस्त्यावर प्राण सोडीत होते. जीवनाची कळा मरणाच्या काळयाकुट्ट छायेने काळवंडून गेली होती. माणसे रडत होती. ठेचकाळात होती. तडफडत होती आणि माना टाकीत होती, हे विदारक दर्शन तूकारामांना घडले. १

संवसारे झालो अतिदुःखे दुःखी मायबाप सेखी कमिलिया

दुष्काळे आटिले द्रव्ये नेला मान। स्त्री एकी अन्न अन्न करता मेली

लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुखे। वेवसाय हे देरवे तुटी येता.

ही झाली गृहस्थ तुकारामाची भुमिका.

भागवत धर्ममंदीराचा कळस बनलेले संतकवि तुकाराम हे मराठी सारस्वताचे

एक उतुंग शिखर आहे.  त्यांची कविता या महाराष्ट्राच्या आपल्या ह्यदयात खोलवर जपून ठेवली आहे महाराष्ट्राच्या जीवनावर तिचे दीर्घ व दृढ संस्कार झाले आहेत.

तुकारामाचे व्यक्तित्व केवळ समर्थ आणि संपन्न आहे असे म्हणण्यात विशेष नवीन काही नाही पण त्याकडे पहात राहावे अशी एक लक्षणीयता त्याच्यात आहे. खरे तर तुकाराम हा एक सर्वसाधारण संसारी मनुष्य मळलेल्या वाटेने चालत राहीलेला एक सामान्य पथिक सामान्य माणसाच्या वाटयाला येणारी सारी सुख दुःखे त्यांच्याही पदरात पडली होती.

पण काही माणसे आपल्या सुखदुःखाकडे विशेष लक्षपूर्वक पाहू शकतात आपल्या आयुष्याचा अन्वयार्थ लावण्याची धडपड ते करीत असतात बहुसंख्य लोक असा विचार न करता चालत राहतात आणि एक दिवस त्यांची वाट अंधारात दिसेनाशी होते. तुकाराम मात्र आपल्या जीवनात उद्‌भवणाऱ्या प्रत्येक संकटाच्या क्षणाने सावध होत होते सुखदुखाच्या स्वरूपाचा शोध घेत होते त्याच्या या आंतरिक प्रवृतीमुळे प्रवाहाबरोबर अगतिकपणे वाहत जाण्याला त्यांनी नकार दिला. त्यांच्या बरोबर वाहत चाललेले लोक त्यांना दिसत होते उद्‌दाम वेगाने वाहणाऱ्या लोंढयाला अटकाव करण्यात अर्थ नसतो हे समजण्याचा व्यावहारीक शहाणपणा तुकोबात नव्हता धिटाईने प्रवाहाचा आवेश आपल्या छातीदर झेलण्याचा ते प्रयत्न करू लागले या चमत्कारीक संघर्षात अनेक वेळा त्यांना पराभूत व्हावे लागले अदृश्य नियती या सामान्य भासणाऱ्या असामान्यत्वाला आव्हान देत होती सर्व समर्थ नियतीपुढे आपण गलित मात्र झालो आहोत. असे मात्र या चिवट वृत्तीच्या माणसाला वाटले नाही आपले सारे बळ एकवटुन तो झगडत होता झुंजत होता.

तुकारामांचे सारे आयुष्य आणि काव्य हे त्यांनी केलेल्या अखंड संघर्षाचे एक प्रतीक आहे शरणागती न पत्करणारी माणसे आपल्या बंडखोरीमुळे बिकट वाटेने चालू लागतात.

एक दिवशी चारचौघांबरोबर पायाखालची वाट तुडवीत निघालेला हा आगळा माणूस एका नव्या खडतर वाटेने पाउले टाकू लागला यातून त्यांचे व्यक्तित्व व

साहित्य वाढत गेले.

लहान असलेला तुकाराम आपण आकाशाएवढे झालो अशी ग्वाही देवू लागला. त्याचे सामान्यपण संपले असामान्यत्वाच्या तेजाने त्यांचे व्यक्तित्व झळाळून उठले. आज अवघ्या महाराष्ट्राच्या समोर तुकोबांची जी जिवंत मुद्रा आहे आणि आजही साधारणापासून असाधारणापर्यंत सा–यांना ती प्रेरणा देत आहे याचे कारण तुकोबांचे व्यक्तित्व आणि साहित्य सर्वार्थांनी चैतन्यपूर्ण आहे

एखाद्या कळाहीन कोळशातून ज्वाळा उफाळावी आणि सामान्य पदार्थाला एक दिप्तीमान सौंदर्य प्राप्त व्हावे तशीच अवस्था तुकोबांच्या चरित्राची आणि साहित्याची आहे. सुदैवाने त्यांनी त्यांच्या आयुष्यासंबधी काव्यातून काही उल्लेख केले नाही काही व्यक्तिंची व्यक्तित्वे चौकटीत सामावली जात नाही त्यांनी अशी झेप घेतलेली असते की तिचा अंदाज करणे कठीण व्हावे.

तुकारांमाचे चरित्र हे एक सामान्य संसारी माणसाचे चरित्र आहे असे त्यामुळे वाटत नाही या चरित्रातुन नव्या वाटा मिळू शकतात हे चरित्र आपल्याला अस्वस्थ आणि अंर्तमुख करते.१

## संत कुणाला म्हणावे ?

खरे संत विरळ असताल व सहज सापडत नाहीत असे तुकारामांचे मत आहे.

आपल्यास संत म्हणविणाऱ्या अनेक लोकांना आपण पाहतो त्यांच्यावर कोण विश्वस ठेवणार परीक्षेची वेळ आली की खरा संतपणा दिसून येतो पावसाळयात शुद्र ओहोळसुद्धा भरून राहतात. परंतु पावसाळा गेला की एक थेंबसुद्धा पाणी त्यात राहत नाही दुरून गारा देखील हिऱ्याप्रमाणे दिसतात. पण घण घातला नाही तोपर्यंत!

बरेच लोक संतासारखे दिसतात परंतू ते खरे संत नव्हेत. नूसते कवित्व करणारे संत नव्हेत संताचे आप्त संत नव्हेत एकतारी धरणारे संत नव्हेत गोधडी पांघरणारे संत नव्हेत, कीर्तन व पुराण सांगणारे संत नव्हेत, वेदपठण करणारे संत नव्हेत, तीर्थाटन करणारे किंवा वनास जाणारे संत नव्हेत, माळमुंद्रा करणारे

किंवा भस्म लावणारे संत नव्हेत देहभाव निरसला नाही असे सर्व संसारिक संत नव्हेत, भोंदू संत हे चिरगुटे घालून पोट वाढवून गरोदर असल्याचा देखावा व बोभाट करणाऱ्या स्त्रियांप्रमाणे आहेत त्यांच्या स्तनात दूध नसते पोटात पोर नसते शेवटी त्या वांझ असल्याचे कळून लोकांत त्यांची फजिती होते.

तुकाराम भोंदू गुरू नाही लोकांना भुरळ पाडावयाची कपटविदया त्यांना ठाउक नाही. त्यास चमत्कार करून दाखविता येत नाही त्यांची शिष्य शाखा नसते. तो निष्क्रिय लोकांना उपदेश करावयस जात नाही तो मठपति नसतो. तो वेताळास प्रसन्न करून त्यास आपल्या इच्छेप्रमाणे करावयास सांगत नाही. तो घटपटादि तार्किक वाद घालणारा पंडीत नसतो तो डोक्यावर खापरात घातलेला विस्तव जाळीत उत्साहाने उदो उदो म्हणत नाही. माळ हालवित नाही व मुर्ख लोकांना आपल्या भोवती गोळा करत नाही जारण, मारण स्तंभनानिदि मंत्रतंत्र विदया त्यास माहीत नसते. नरकात कायमचे घर करणारा असा वेडा पिता तुकाराम नाही असे तुकाराम म्हणतात.

संताचा महिमा कळणे फार कठीण आहे येथे शब्द ज्ञान कामाचे नाही म्हैस पुष्कळ दूध देणारी झाली तरी ती कामधेनूची सरी पाविल काय? आपण स्वतः संत व्हावे म्हणजे खरे संतपण काय आहे हे कळते तुम्ही थोर कृपावंत संत आहा तुमची किर्ती मी पतित कसा वर्णू शकेन ? जड जीवांचा उद्धार करावा हाच तुमच्या अवतांराचा हेतू आहे. देवाची भक्ती भाव धर्म वाढवावा हेच तुमचे कार्य आहे. जवळच्या दुसऱ्या झाड़ांना आपल्यासारखे सुंगधी करणे हा चंदनाचा अंगाचा गुण आहे त्याचप्रमाणे जगातील सर्व लोकांना आपल्याप्रमाणे पवित्र करणे हा तुमचा सहज धर्म आहे.

## संताची लक्षणे –

संताचे पहिले लक्षण म्हणजे तो शांत व स्तब्ध असतो हिऱ्याप्रमाणे संकटाचे घाव सहन करतो ऐरणीवर ठेवून घण मारिले असता जो भंग पावत नाही तोच हिरा

अत्यंत मौल्यवान ठरतो.

जे वस्त्रात ठेवून वस्त्रास आग लावली असता जळत नाही तेच रत्न किमंतीचे होय. जगाचे आघात जो शांतपणे सोसतो तोच खरा संत होय.

संताचे दुसरे लक्षण – देवाचा भक्त देवालाच प्रिय असतो तो दुसऱ्याची फिकिर करत नाही तो कोणाचा मित्र व आप्त नसतो. तो सर्वांपासून दूर असतो लोक बापडे त्याला वेडा म्हणतात रानीवनी किंवा भल्या ठिकाणी तो राहतो प्रातःस्तान करून भस्म लावून बसला तर लोक त्यांची निंदा करतात. तुळसी माळ गळयात घालून तो स्वस्थ एकातात बसला तर त्याला काय झाले अशी लोक शंका घेतात त्यास वाटते त्या ठिकाणी बसावयाची किंवा गाण्याची लाज वाटत नाही व म्हणून त्याचे आईबाप व आप्तेष्ट त्याच्या राहणीला शिव्या घालतात बायको त्यास षंढ म्हणते तो मेला तर बरे अशा शिव्या देते जो संसारावर रूसतो तोच सिद्धाच्या पदवीस पोहचतो असे तुकाराम म्हणतात ( अ. ११८५)

चमत्कार करणे हा काही खऱ्या संताचा विशेष नव्हे असे तुकाराम म्हणतात

- देवाच्या दासास कशाचीही भिती नसते.
- संतास मुत्युचे भय नसते.
- रंजलेल्या गांजलेल्यास आपले म्हणतो तोच खरा संत.
- आपल्या प्रमाणेच दुसऱ्याला लेखतो ती संत
- किती संकटे आली तरी संत आपला नेम चुकू देत नाही.
- आम्ही विष्णुदास मेणाहुनि मऊ पण व्रजासाहि मेदू
- जीव समर्पण केल्याशिवाय संतपण मिळकत नाही.
- संत सर्व प्रकारच्या कर्म बंधनापलीकडे जातो.
- संत कळिकाळास भित नाही
- संताला प्रपंच ओकलेल्या अन्नासारखा त्याज्य वाटून त्यापासून मन विटते संताला सोने रूपे मातीप्रमाणे व हिरमाणके दगडाप्रमाणे वाटतात सूंदर स्त्रिया

अस्वलाप्रमाणे वाटतात.

ही सर्व संताची लक्षणे स्वतः तुकारामांनी सांगितली आहेत.

संत तुकाराम महाराजांनी समाजसेवा प्रबोधन आणि परिवर्तन वादी वारकरी संप्रदायात सुधारकाची भूमिका बजावली अभंग किर्तन यांच्या माध्यमातून आपले जीवन समाजसेवेच्या सत्कारणी लावले परमार्थ साधना करीत असताना समाजाची सुखदुखे आस्थेने व जवळून पाहीली आणि हे करीत असताना जीवनाचे अंतिम सत्य परमेश्वराचे रूप नामस्मरण यावरही त्यांनी लक्ष दिले

जीवनाची तीव्र अनुभूती, परमार्थ साधना कवित्व, साधुत्व, शुचित्व, निश्चयाचे बळ परमेश्वर भक्तिची ओंढ, समाजभिमुख जीवनदृष्टी लोकोपदेश करण्याचा अधिकार इ गुणांचे अंगिकारातून त्यांनी संत व कवित्व यांची एकरूप होवून पंढरीची वारी आणि पांडूरंग सेवा या माध्यमातून सर्वसामान्य आणि सर्वमान्य असा भक्तिमार्ग पुरस्कृत केला.

भगवान श्रीकृष्णाच्या भागवत धर्माचा संदेश ज्ञानदेव नामदेव एकनाथांची परंपरा पुढे चालवून सोप्या व सुत्रमय भाषेत सुलभ दृष्टांतानी महाराष्ट्रात खेडया पाडयातील जनतेपर्यंत पोहचविण्याचे महान कार्य तुकाराम महारांजानी केले साधकावस्थेत चारी भिंतीनी कोंडलेल्या घरातून आणि क्षुद्र व संकुचित लौकिक व्यवहारातून बाहेर पडून उंच डोंगरावर निसर्गाच्या सानिध्यात आकाशाच्या आच्छादनाखाली पृथ्वीच्या आसनावर बसून त्यांनी साधना केली गीता भागवताचा सखोल अभ्यास केला, निर्भय आत्मपरीक्षण केले प्रयत्नावादाचे ते मूर्तिमात अवतार होते ईश्वर दर्शनाच्या तीव्र तळमळीने व दृष्टनिश्चयाने ते विठ्ठल भक्तीच्या मार्गाला लागले आणि याच देही याच डोळा त्यांनी इश्वर दर्शन घेतले साक्षात्कारी संताच्या मालिकेत त्याचे स्थान फार मोठे आहे.

भागवत धर्माच्या रक्षणासाठी आपला जन्म आहे याची जाणीव त्यानां याच वेळी झाली.

" जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोच खरा साधू ओळखावा देव तेथेची जाणावा " असे सांगून त्यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार केला " वेदांचा अर्थ आम्हासीच ठावा " अशी त्यांची भूमिका होती त्यामुळे त्यांच्या अभंगवाणीला वेदवाणीची योग्यता आली त्यांची प्रासदिक वाणी जितकी प्रांजल तितकी प्रसंगी फटकळ होती. समाजातील दंभ ढोंग विषमता निर्दयता याच्यावर ते तुटुन पडतात. 2

तुकारामानी आपले मरण आपल्या डोळयांनी पाहीले याचा अर्थ असा की त्यांनी आपल्या देहभावाचे मरण पाहीले इश्वरी साक्षात्कार होताच देह मृत झाला.

" मी माझे मरण आपल्या डोळयांनी पाहीले तो सोहळा अनुपमय होता सर्व जग आनंदाने कोंदाटले व सर्वात्मक भावाने मी त्याचा उपभोग घेतला.

आजवर अहंकारमुळे मी एकदेशी होतो त्याचा त्याग केल्यामुळे आनंदाचा सुकाळ झाला. जन्ममरणाचे सुतक फिटले व मी माझेपणाचा संकोच दूर झाला नारायणाने मला आश्रय दिला व मी देवाचा महीमा जगास जाहीर करीत आहे. ( अ. १८९७)

दुसऱ्या अभंगात तुकाराम आपल्या देहाच्या प्रेतयात्रेचे वर्णन करीतात शरीराचा भाव प्रेतरूप झाला व तो स्मशानी नेऊन ठेविला काम क्रोधदि वासना आपला धनी गेला म्हणून धाय मोकलून रडतात. आपली सत्ता गेली म्हणून यमधर्म रडतो वैराग्याच्या शेणी अंगाला लागल्या व ब्रम्हत्वाचा ज्ञानाग्नि भडकला. अहंभावाचा घट डोक्याभोवती फिरवला व पायावर फोडिला "अहंब्राम्हासी " या महावाक्याची मोठी बोंब उठली फळ नामरूपाला तिलांजली दिली व शरीर ज्याचे त्यास समर्पण केले. शरीराची रक्षा होत असता त्यावर गुरू कृपेचा दिवा जळत होता (अ १८९६)

या मुत्युमुळे माझ्या मनात अविनाशी ज्योत पेटली, देह रिकामा केला, तेव्हा देवाची तेथे वस्ती झाली. माझ्या शरीराच्या मरणामुळे तेथे अखंड ज्योत पेटली व

एका घावासरशी तुकारामाचे ऐहिक अस्तित्व नाहीसे केले. ( अ. २६३७)

मी मेलो तेव्हा माझे शरीर मी देवास दिले आता सेवा कोणाची करणार सुत्रधार हलवितो त्याप्रमाणे पूतळी आपले हातपाय हालविते देव बोलावितो तसा मी बोलतो पुण्य पापांना संबध आम्हास नाही ज्याचे तोच जाणे आम्ही देहातीत झालो असे तुकाराम सांगतात. ५ यातूनच तुकाराम संत होते याची जाणीव होते.

तुकारामांची भूमिका धर्मसुधारक आणि समाज सुधारकाची असल्यामुळे त्यांना तत्कालीन समाजातील प्रतिगामी शक्तीशी सतत मुकाबला करावा लागला त्यांची कविता सर्वसामान्य लोकांच्या अध्यत्मिक आणि सामाजिक उन्नतीचा उच्चार असल्यामुळे त्यांच्याच हयातीत त्यांच्या कविता इंद्रायणीत बुडवण्यात आल्या. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकला न्यायालयात खटला चालवला गेला त्यांना मारहाणीही करण्यात आली.

तुकोबांची कीर्ती ऐकून अनेक जातिधर्माची मंडळी तुकोबांचे किर्तन ऐकायला येत असत. बहिणाबाई सिउरकर ही ब्राम्हण स्त्री तुकोबांकडे शिष्यत्व मागायला आली. अनेकांनी तिला ब्राम्हण असून एका शुद्राला गुरू करण्याबद्दल दुषण दिले होते.

तुकोबा ९ मार्च १६५० रोजी अचानक किर्तन करताना आपल्या शरीरासह गुप्त झाले. हया संदर्भात विद्वान संशोधकांत आणि समिक्षकात अनेक मतमतांतरे आहेत. तुकोबांनी समाधी घेतली. तुकोबांनी आपला देह इंद्रायणीत विसर्जित केला. तुकोबा तिर्थयात्रोला निघून गेले. तुकोबांचा मंबाजी आणि रामेश्वर भटांनी मिळून खून केला आदि परंतू तुकारामाचे कार्य मात्र ९ मार्च १६५० पासून भौतिक अर्थाने संपले. परंतु तुकारामाला संपविण्याची कुवत मात्र हया युगात निश्चितच नाही. अशा प्रकारे तुकाराम, संत तुकाराम, कवि तुकाराम, व विद्रोही तुकाराम, या चारही भूमिकांचा मिलाफ असणाऱ्या महापुरूषाच्या चरित्राचे विवेचन करणे हे फार मोठे काम आहे. कारण पुरोगामी विचार आले विचारवंत आणि सुधारक झाले गेले सुधारणा वाढल्या

परीवर्तनाच्या चळवळी आल्या, वाढल्या, खुंटल्या, बुरसटल्या हया युगात सर्व काही झाले पण तुकाराम मात्र कायम आहेत त्यांचा विचार कायम आहे त्यांची भाषा वाणी कायम आहे. कविकाळाला हादरा देणारी तुकोबाची वाणी होती तुकारामानी समाजाची नाडी अचूक ओळखली होती ते द्रष्टे होते म्हणूनच ते हजार वर्षाच्या युगाचा प्रतिनिधी बनू शकले.